सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मालवण

मु. पो. कुंभारमाठ ,ता:- मालवण जि.:- सिंधुदुर्ग.- ४१६६०५

ईमेल : office.gpmalvan@dtemaharashtra.gov.in

दि.२७/०८/२०२६

## संस्थास्तरीय प्रवेश फेरी

शासकीय तंत्रनिकेतन मालवण या संस्थेमध्ये संस्थास्तरावर शैक्षणिक वर्ष 2026-27 मधील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या रिक्त असलेल्या जागांमध्ये प्रवेश घेण्याकरिता एक संधी देण्यात येत आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता विहित कलावधीत ऑनलाइन रजिस्ट्रेशन केलेले उमेदवार व जे उमेदवार नॉन कॅप करिता रजिस्ट्रेशन करणार आहेत / केलेले आहेत अशा सर्व उमेदवारांकरिता ही फेरी दि.०१ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या फेरीसाठी इच्छुक उमेदवारांनी दि. ०१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत संस्थेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून रजिस्ट्रेशन करणे अत्यावश्यक आहे

### वेळापत्रक

| अनु. क्र. | प्रक्रिया | दि.०१ सप्टेंबर २०२६ रोजीचे वेळापत्रक |
|---|---|---|
| १ | संस्थेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून नाव नोंदणी करणे | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० पर्यंत |
| २ | संस्थास्तरावर तात्पुरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | दुपारी १.०० वाजता |
| ३ | गुणवत्ता यादीमधील त्रुटींची पूर्तता करणे | दुपारी १.३० वाजेपर्यंत |
| ४ | अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | दुपारी २.०० वाजता |
| ५ | प्रवेश प्रक्रियेस सुरुवात | दुपारी २.१५ वाजलेपासून |

**दि. ०१ सप्टेंबर २०२६ रोजी प्रवेश फेरी झाल्यानंतर जागा शिल्लक राहिल्यास पुढील प्रवेश फेरी दि. ११ सप्टेंबर २०२६ तसेच त्या नंतरही जागा शिल्लक राहिल्यास शेवटची प्रवेश फेरी दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी वरील नमूद पद्धतीनेच घेण्यात येईल.**

**प्रवेशासाठी पात्रता:**

या फेरीसाठी CAP मधून रजिस्ट्रेशन केलेले, NON CAP मधून रजिस्ट्रेशन केलेले तसेच ज्यांनी या अगोदर कोणत्याही पॉलिटेक्निक मध्ये प्रवेश घेतला आहे असे सर्व उमेदवार पात्र असतील.

### संस्थास्तरीय प्रवेश फेरीची नियमावली

१) या संस्थास्तरीय फेरीमध्ये केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त असलेल्या व होणाऱ्या जागा भरण्यात येणार आहेत

२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान रिक्त जागा ज्या प्रवर्गा करिता राखून ठेवलेली आहे त्याच प्रवर्गाच्या उमेदवारा मधूनच भरण्यात येईल तदनंतर जागा रिक्त राहिल्यास त्या जागा गुणवत्तेच्या आधारे सर्वांकरीता खुल्या होतील

३) संस्थास्तरीय प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळाल्यास कोणतीही शिष्यवृत्ती योजना लागू होणार नाही तसेच संस्थेची प्रवेश फी एकूण रुपये 7750/- Online Payment (G-Pay,Phone Pe) च्या स्वरूपात त्वरित भरावी लागेल.

४) विद्यार्थ्यांनी इतर संस्थेत प्रवेश घेतलेला असल्यास आणि या फेरीमध्ये प्रवेश मिळाल्यास तेथील प्रवेश रद्द करण्याची ऑनलाईन कार्यवाही स्वतः करावयाची असून या संस्थेची ती जबाबदारी असणार नाही.

५) प्रवेश निश्चित करताना पूर्ण फी, मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतीचा एक संच सोबत आणावा

६) ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी व अर्ज केलेला नाही अशा विद्यार्थ्यांनी संस्थेत येण्यापूर्वी www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी व अर्ज भरणे आवश्यक आहे विद्यार्थ्यांनी सर्व मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतीचा एक संच घेऊन संस्थेत उपस्थित राहावे.

७) ज्या विद्यार्थ्यांना जागावाटप होईल त्यांनी त्याच दिवशी प्रवेश मिळालेल्या विभागात आपला प्रवेश संपूर्ण फी भरून निश्चित करावयाचा आहे.

**विशेष सूचना: या फेरी मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शासकीय शिष्यवृत्ती / फी-सवलत लागू असणार नाही तसेच प्रवेश रद्द केल्यास भरलेली फी परत मिळणार नाही.**

अधिक माहितीसाठी संपर्क: प्रा. दत्तप्रसाद गोलतकर (9764513133)

दि. ०१ सप्टेंबर २०२६ रोजी प्रवेश फेरी झाल्यानंतर जागा शिल्लक राहिल्यास पुढील प्रवेश फेरी दि. ११ सप्टेंबर २०२६ तसेच शेवटची प्रवेश फेरी दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी वरील नमूद पद्धतीनेच घेण्यात येईल.

या फेरीसाठी रिक्त जागांची माहिती संस्थेच्या www.gpmalvan.co.in या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

शासकीय तंत्रनिकेतन सत्यमेव जयते मालवण

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, मालवण